


## इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी ॲड. संपदा बापट

**माथेरान :** इनरव्हील क्लब ऑफ पनवेल २०२४-२०२५ साठी नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी डॉक्टर शोभना पालेकर यांनी नवनिर्वाचित सर्व टीम मेंबर्सना शुभेच्छा दिल्या व बहुमूल्य मार्गदर्शन करण्यात आले. नवनिर्वाचित ॲड. संपदा बापट यांनी प्रेसिडेंट पदाचा पदभार देत डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉक्टर शुभदा पालेकर यांनी सन्मानित केले व येणाऱ्या २०२४ ते २०२५च्या नवनिर्वाचित प्रेसिडेंट ॲड. संपदाबाबत यांनी जबाबदारी घेत पुढील प्रोजेक्ट बद्दल माहिती देत पूर्ण टीमचे आभार व्यक्त केले. नवनिर्वाचित कार्य करण्याचे प्रेसिडेंट म्हणून ॲड. संपदा बापट, व्हॉइस प्रेसिडेंट रश्मी वरिया, सेक्रेटरी अंजली राजपूत, खजिनदार मोना जेठवा, आय एस ओ संध्या शाह, एडिटर नीता भाटिया, आय पी पी शिल्प राजपूत सल्लागार समितीच्या संतोष सिंग, अनुराधा शुक्ला नवीन पनवेल यांच्या हाती असेल ही नवीन टीम २०२४ ते २०२५ चा पूर्ण कारभार ही स्टीम सांभाळणार आहे.

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता दुभाजकावर वृक्षवल्लीशी सोयरिक

**५० फुटांपर्यंतचे वृक्ष तोडले ; ५ फुटांचे वृक्षारोपण केले सुरू**

◆ **पोलादपूर (वार्ताहर):**



मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगतची सुमारे ५० ते ५५ वर्षांपूर्वीचे तब्बल ५० फुट उंचीचे महाकाय वृक्ष तोडून गेल्या चार वर्षांपासून संपूर्ण महामार्ग बोडका केला गेला. आता गेल्या महिन्यापासून पोलादपूर पूल ते वीर रेल्वेस्टेशनपर्यंत रस्ता दुभाजकासह महामार्गाच्या दुतर्फा वृक्षवल्लीच्या सोयरिकीचा नमूना म्हणून तब्बल १ फूटापासून ५ फूटापर्यंत उंचीची रोपे लावण्याचे काम सुरू असल्याचे दिसून येत आहे.

पहिल्या टप्प्याचे पळस्पे पनवेल ते माणगांव इंदापूरपर्यंतचे काम गेली दहा वर्षे सुरू असून ते पूर्णत्वास गेले नसले तरी या पहिल्या टप्प्यातील सुमारे १० हजारांहून अधिक झाडांची कत्तल करण्यात आली आहे. या कामातील कर्नाळा पक्षीअभयारण्य आणि सुकेळीखिंड भागात वृक्षतोडीचे प्रमाण सर्वाधिक होते. इंदापूर ते चिपळूण दरम्यानच्या दुसऱ्या टप्प्यातील महाड तालुक्यातील वीर ते पोलादपूर तालुक्यातील भोगावपर्यंतच्या मधल्या टप्प्याचे चौपदरीकरण करण्यासाठी लार्सन ॲण्ड टूब्रो कंपनीला ठेका देण्यात आला आहे. या मधल्या टप्प्यामध्ये २ हजार ८१७ एवढ्या पूर्ण विकसित झाडांची कत्तल करण्यात आली. यापैकी वनविभागाच्या महाड गटामध्ये १ हजार ४९ तर पोलादपूर गटामध्ये ६९७ पूर्ण विकसित झाडांची कत्तल करण्यात आली. ही संख्या केवळ सामाजिक वनीकरण विभागामार्फत लागवड करून वनविभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या झाडांची असून खासगी मालकी झाडांचा मोबदला मूळ मालकांना देण्यात येऊन या झाडांची कत्तल करण्यास वनविभागाची अनूकूलता प्राप्त होऊन वनसंवर्धन व वनरक्षणाची जबाबदारी असलेल्या वनविभागाला मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ बाबत पूर्णतः विपरित असे वृक्षतोडीची परवानगी देण्याचे धोरण राबवावे लागले. मात्र, यानंतर लार्सन ॲण्ड टूब्रो कंपनीला यासाठी १० हजार झाडांची लागवड करण्याचे काम सोपविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत, तोडलेल्या एका वृक्षाच्या खोडाचा व्यास सुमारे अर्धा ते दीड मीटर एवढा रूंदीचा अन् पानांचे प्रमाणही डेरेदार असताना नव्याने लावले जाणाऱ्या नव्या रोपट्यांची उंची १ फुटांपासून ५ फुटांपर्यंत असून केवळ अर्धा इंच ते एक इंच व्यासाचे खोड आणि पानेही केवळ १५-२० असणार या वस्तुस्थितीमुळे वृक्षतोडीच्या चारपटीने वृक्षलागवड करूनही सावली मिळणार नसून कार्बन क्रेडिटचा प्रश्नदेखील सुटत नसल्याचे दिसून येत आहे.

यादरम्यान, पोलादपूर तालुक्यात चार वर्षांपूर्वीदेखील राष्ट्रीय महामार्गाच्या मधोमध रस्तादुभाजकावर वृक्षवल्लीसोबत सोयरिक कोणी सुरू केली आहे, याबाबत चर्चा सुरू असून एलॲण्डटी ठेकेदार कंपनीने हे काम परस्पर पोटठेकेदारामार्फत सुरू केले असून या कामाच्या दर्जा व गुणवत्ता नियंत्रणासाठी वनविभागामार्फत तसेच सामाजिक वनीकरण विभागामार्फत विशेष प्रयत्न होण्याची आवश्यकता व्यक्त झाली.

मात्र, यानंतर काही कालावधीतच मागील वेळीचे वृक्षारोपण वृक्ष संवर्धनाअभावी नष्ट होऊन यंदा नव्याने महामार्गाच्या रस्ता दुभाजकावर तसेच महामार्गाच्या मुंबई मार्गिकेसह गोवा मार्गिकेच्या साईडपट्ट्यांवरदेखील पाच फुटांपर्यंतच्या उंचीची रोपे लावण्यात आली आहेत. या रोपांचे संरक्षण होण्यासाठी रोपांभोवती ग्रीन नेटस् लावण्यात आल्या असून काही ठिकाणी वाऱ्या-पावसाच्या जोराने या ग्रीन नेटस आतील रोपासह वाकल्याचे दृश्य दिसून येत आहे.

**१९ कोटी ४४ लक्ष ८२४ रुपयांची तडजोड रक्कम वसूल**

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये १२ हजार ३२८ प्रकरणे निकाली




◆ **अलिबाग (प्रतिनिधी) :**

दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने रायगड जिल्ह्यात आयोजित केलेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये वादपूर्व व दाखल अशी एकूण १२ हजार ३२८ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर २७ जुलै रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे तसेच वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए.एस. राजदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ४७ हजार ६८ वादपूर्व प्रकरणे व १२ हजार २९६ प्रलंबित अशी एकूण ५९ हजार ३६४ प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती.

त्यापैकी १० हजार २६५ वादपूर्व प्रकरणे व २ हजार ६३ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण १२ हजार ३२८ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोकअदालतीमध्ये निकाली निघाली असून, त्याद्वारे पक्षकारांना एकूण १९ कोटी ४४ लक्ष ८२४ रुपयाची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे. त्याचबरोबर दोन जोडप्यांचा या लोकअदालीतमध्ये संसार जुळला. पनवेल आणि अलिबाग यामध्ये तालुक्यांमध्ये समावेश आहे.

मोटार अपघात प्रकरणांच्या एकूण ३४ प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून, पक्षकारांना ४ कोटी १४ लाख ४४ हजार ५४६ रुपये इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. अलिबाग येथील पक्षकारांचा प्रमुख जिल्हा न्यायाधीश ए.एस. राजदेकर व पॅनलवरील न्यायाधीशांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर यावेळी प्रतिकात्मक धनादेशही देण्यात आला. रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत २७लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करुनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोकन्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधिक्षक, रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजदेकर व न्यायाधीश तथा सचिव अमोल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

## वेचक

### रंजना पैर यांचे निधन



**मुरुड :** येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका सचिव विजय पैर आणि सुप्रसिद्ध साहित्यिक सिनेनाट्य कलावंत अभय पैर यांच्या मातोश्री श्रीमती रंजना पैर यांचे बुधवार दि. २४ जुलै २०२४ रोजी सकाळी १०-२५ वा. वयाच्या ८४ व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणून मुरुडमध्ये त्या परिचित होत्या. त्यांच्या अंत्यविधीला जिल्ह्यातून, तालुक्यातून मान्यवर तसेच आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार ग्रामस्थ उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पती जनार्दन पैर गुरुजी, दोन मुले, एक मुलगी, दोन सुना, तीन नातवंडे आणि अनेक ऋणानुबंधनाने जोडलेली मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शाळेच्या सायन्स लॅबचे उद्घाटन



**कर्जत :** शहरातील कर्जत महिला मंडळाच्या विद्या विकास मंदिरमध्ये सायन्स लॅबची उभारणी करण्यात आली. ए ए के इंडिया खालापूर आणि आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशन यांच्या प्रगती उपक्रमातून या विज्ञान लॅबची निर्मिती झाली आहे. आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते या सायन्स लॅब कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. खालापूर येथील एएके इंडिया कंपनीचे व्यवस्थापक गणेश डोईफोडे यांनी शाळेच्या सायन्स लॅब साठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर कर्जत शाळेला आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि एएके इंडिया खालापूर यांच्या प्रगती या उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या सायन्स लॅब चे उद्घाटन कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे आणि ए ए के इंडिया कंपनीचे व्यवस्थापक गणेश डोईफोडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी पाहुणे म्हणून उद्योजक मनोज गावंडे, मदन ओक तसेच पूजा सुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### नेत्रचिकित्सा शिबिराला रुग्णाचा प्रतिसाद



**कर्जत :** नेरळ येथील साई तुलसी मित्र मंडळ आणि शिवगर्जना मित्र मंडळ यांच्या माध्यमातून डोळ्यांचे चिकित्सा शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात तब्बल १२५ रुग्णांनी नेत्र चिकित्सा करून घेतली. ठाणे भाईंदर येथील भक्ती वेदांत हॉस्पिटल, रिसर्च इन्स्टिट्यूट तसेच साई तुलसी मित्र मंडळ नेरळ आणि शिवगर्जना मित्र मंडळ यांच्या माध्यमातून नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते.शिबिरामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी तपासणी करण्यात आली आणि रुग्णांच्या इच्छेनुसार मोतीबिंदू दोष असलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया वेदांत हॉस्पिटल मध्ये करण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना मधून लाभ दिला जाणार आहे. तर नेत्र दोष असलेल्या रुग्णांना कमी दरात चष्मे वाटप करण्यात आले.

# ‘त्या’ २० ई रिक्षाचालकांच्या चौकशीचे सुप्रीम कोर्टाचे आदेश

◆ **माथेरान (वार्ताहर) :**



सुप्रीम कोर्टाने सनियंत्रण समितीच्या निर्णयानुसार वीस ई रिक्षांना दि १५ एप्रिल रोजी परवानगी दिली होती त्यानुसार सनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार एकूण ९४ परवानाधारक हात रिक्षा चालकांमधून २० हात रिक्षा चालकांची पहिल्या टप्प्यात निवड करण्यात आली. या वीस हात रिक्षा चालकांनी ई रिक्षा विकत घेऊन दि.१०जून पासून सुरू केल्या आहेत. त्यामुळेच इथले पर्यटन मोठया प्रमाणात बहरलेले दिसत आहे.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दि.२२ जुलै रोजी वीस ई रिक्षा चालकांची माहिती प्रतिज्ञापत्रा द्वारे सुप्रीम कोर्टाला देण्यात आली. ९४ पैकी ज्या ४३ हात चालकांनी ई रिक्षा चालविण्यासाठी आवश्यक परवाना प्राप्त केलेल्यांची यादी जोडण्यात आली आहे याची माहीती श्रमिक रिक्षा चालकांचे वकील ॲड. ललित मोहन यांनी कोर्टाला दिली मात्र घोडेवाल्यांचे वकील यांनी वीस ई चालकांवर हरकत घेत सांगितले की हे सर्व हॉटेल मालक व उद्योजक आहेत या हरकतीची सविस्तर चौकशी व्हावी यासाठी न्यायाधीश भूषण गवई यांनी रायगड जिल्ह्याच्या प्रधान न्यायाधीशांमार्फत चौकाशीचे आदेश जारी केले. राज्य सरकारने दाखल केलेले प्रतिज्ञापत्र याचा संदर्भ घेत या चौकशीत हात रिक्षा चालक व अश्वपाल संघटना यांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी. चौकशी अहवाल एक महिन्याच्या आत कोर्टाला सादर करायचा आहे. पुढील सूनवाई २३ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे.

सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचा आम्ही सन्मान राखतो. चौकशी समोर सर्व वीस ई रिक्षा चालक आपली सत्य बाजू मांडतील यातून निश्चितच त्यांना न्याय मिळेल, असा आशावाद याचिकाकर्ते सुनिल शिंदेंनी व्यक्त केला आहे. तर ई रिक्षाची सेवा ही फक्त ३० टक्के नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. माथेरानच्या दूरवर राहणारी कुटुंबे अद्यापही या सेवेपासून वंचित आहेत. हे अन्यायकारक आहे. ई रिक्षांची संख्या वाढवणे व सर्व नागरिकांना ई रिक्षाची सेवा मिळालीच पाहिजे त्यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे माथेरानचे कोकणवासी समाज संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत सुतार यांनी म्हटले आहे.

# रोह्यातील पूरपरिस्थिती पूर्वपदावर ; मात्र पंचनामे नाहीत

◆ **रोहा (वार्ताहर):**



गेले आठ दिवसापासून सतत पडत असलेल्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती. कुंडलिका नदीची उपनदी महिसदरा नदिनी धोक्याची पातळी ओलांडली असल्यामुळे पुराचे पाणी गावातील घरात शिरून बरेच नुकसान झाले होते. मात्र आता परिस्थिती पुर्व पदावर आली असली तरी अद्याप पंचनामे झाले नाही. कोणीही जिल्हाधिकारी अथवा तहसिलदार इकडे फिरकेलेले नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

हवामान खात्याकडून देण्यात आलेल्या अंदाजानुसार ८ दिवस सतत पाऊस पडेल हा अंदाज खरा ठरला. कुंडलिका नदिनी धोक्याची पातळी ओलांडली कोलाड पाटबंधारे खात्याकडून दिलेल्या आकडेवाडीनुसार बुधवार दि.२४ जुलै २०२४ रोजी मध्यरात्री १.०० वाजता देण्यात आलेल्या आकडेवारीनुसार कुंडलिका नदीची इशारा पातळी २३ मिटर असून धोक्याची २३.९५ होती ती ओलांडून २५ पर्यंत गेल्यामुळे, कोलाड रोहा पाण्याखाली गेले. नवीन गावठाण, बौद्ध वाडी, आदिवासी वाडी तसेच गोवे गावातील काही घरामध्ये पाणी शिरले असून जीवनावश्यक वस्तूचे नुकसान झाले. यात ड्रम, कोंबड्या, लाकडे वाहून गेले होते. परंतु रात्री १ वाजल्यापासून पहाटे ६ वाजेपर्यंत येथील तरुणांनी नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविले. महिसदरा नदीला संवरक्षण भिंत नसल्याने सर्व पाणी भातशेतीमध्ये घुसल्यामुळे भातशेती ही पाण्याखाली गेली यामुळे भातशेतीचे मोठे नुकसान झाली आहे. यामुळे प्रशासनाकडून झालेल्या नुकसानाचे पंचनामे करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# यशश्री हत्याप्रकरणी आरोपीला फाशी देण्याची कुटुंबीयांसह जनतेची मागणी

◆ **पनवेल (वार्ताहर):**



नवी मुंबईतील अक्षता म्हात्रे हिच्यावर अत्याचार करून तिची हत्या घडल्याची घटना ताजी असतानाच नुकतेच उरणमध्ये एका २२ वर्षीय मुलीची निर्घृण हत्या करण्यात आले आहे. उरण शहरात एन आय हायस्कूलच्या जवळ राहणारी यशश्री शिंदे सकाळी घरातून निघाली ती दुपारी दीडच्या सुमारास उरण बाझार पेठ येथे आढळून आली. मात्र त्यानंतर ती कुठेही दिसली नाही. मुलगी घरी न आल्याने तिच्या नातेवाईकांनी तिचा शोध घेतला. मात्र ती कुठेही आढळून आली नाही. मुलगी बेपत्ता झाल्याचे लक्षात येताच तिच्या कुटुंबीयांनी यशश्री हरविले असल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात नोंदविली. शुक्रवार दिनांक २६/७/२०२४ रोजी रात्री उरण तालुक्यातील कोटनाका येथील पेट्रोलपंप येथे एका तरुणीचा मृतावस्थेत शरीर आढळले. सदर मृत व्यक्तीला इंदिरा गांधी ग्रामीण शासकीय रुग्णालय उरण येथे नेण्यात आले. सदर मृत शरीर यशश्री शिंदेचेच असल्याची तपासातून निष्पन्न झाले आहे. पोस्टमार्टम झाल्यानंतर तिच्या शरीरावर विविध वार करून तिला जखमी करून तिची क्रूरतेने हत्या केल्याची बाब पोस्टमार्टममधून समोर आली आहे. सदर घटना समजताच शनिवार दिनांक २७ जुलै २०२४ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्था, नागरिकांनी इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये धाव घेत घडलेल्या घटनेचा जाहीर निषेध केला.

यशश्रीच्या शरीरावर इतके वार करण्यात आले आहेत की तिच्या शरीराची ओळख पटणे सुद्धा अवघड झाले होते. सदर घटना प्रेम प्रकरणातून घडल्याची प्राथमिक बाब समोर आली आहे. यशश्रीचा खून कोणी केला? याची चौकशी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील करीत आहेत. घडलेली घटना अंत्यत निंदनीय असल्याने सदर दोषी व्यक्तीला फाशी व्हावी, अशी मागणी संतप्त नागरिकांनी केली आहे.

## मातृ-पितृ हरपलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**सुधागड-पाली :** दि प्राइड इंडिया महाड येथील मुख्य कार्यालयात सक्षम प्रकल्प अंतर्गत प्राईड इंडियाच्या वतीने व महानगर गॅस लिमिटेडच्या सहकार्याने कोरोना महामारीमध्ये मातृ-पितृ हरपलेल्या सुधागड व महाड तालुक्यातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात दरमहा कुटुंबाला आवश्यक असलेला किराणा सामान, विद्यार्थ्यांची फी, शैक्षणिक साहित्य, प्रवास गाडीभाडे तसेच औषध उपचारासाठी लागणारे औषधे, तसेच विद्यार्थ्यांचा पाच लाखाचा विमा, इत्यादी मदत दि प्राईड इंडिया यांच्यावतीने व महानगर गॅस यांच्या सहकार्याने करण्यात येणार आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**बांधकाम विभाग**

**निविदा सूचना क्र. ८ (२०२४-२५)**

प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोंबीवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील **२०** कामांकरीता **B-1** नमुन्यात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवित आहेत.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटी शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दि. २९/०७/२०२४ ते दि. ०५/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा ह्या दि. ०५/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात. प्राप्त निविदा दि. ०६/०८/२०२४ दुपारी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासकांनी राखून ठेवला आहे, या बद्दलचा त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**तळ टिप: मी भारताचे भविष्य आहे, मी आता मतदार आहे !**

**सही/-**
**शहर अभियंता**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**जा.क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/१४८१**
**दि. २६/०७/२०२४**

## उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटसअँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना
उज्जीवन स्मॉल फायनांस बँकलि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदाच्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जे आहे जसे आहे तत्वावर" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर"खाली विहित करण्यात आलेल्या दिनाकाला केला जाईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु.मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआरमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4411210130000108 / 4411-KOPARKHAIRNE | **१)प्रभाकर पुरषोत्तम उपाध्याय, २) माया प्रभाकर उपाध्याय,** दोघेही येथे राहणारः सदनिका क्र. २०२, २ रा मजला, ए विंग, कोकण दर्शन, भोपेले, कर्जत रायगड- ४१०२०१ **१) येथे देखील :** ब्लॉक क्र. ००२ , तळ मजला इमा. क्र. ७ फेज क्र. १, साई मोरेश्वर नगर, बंजारपाडा, ता. कर्जत रायगड महाराष्ट्र | 04.11.2022 / Rs.13,28,482.75 as on 20.09.2022 | 20.02.2024 | Rs.13,10,000/- / Rs.1,31,000/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** मौजे / गाव बंजारपाडा, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे वसलेल्या जमिनीच्या धारण केलेल्या सर्वे क्र. १५/२ वर बांधण्यात आलेल्या साई मोरेश्वरच्या फेज १ च्या इमा क्र. ७ च्या तळ मजल्यावरील ३६८ चौ. फू. मोजमाप असलेल्या ब्लॉक क्र. ००२ चा सर्व खंड आणि भूखंड ज्याची मालकी तुमच्याकडे विक्रीसाठी करार दिनांकित ०२/०४/२०१९, धारण केलेला नोंदणी क्र. १४८२/२०१९ अनुसार आहे. | | | | |
| 2 | 4412210080000008 / 4412-THANE | **१) अनिल ओमप्रकाश सोनी, ज्योती अनिल सोनी** दोघेही येथे राहणार : ए – २०५, तिसाई दर्शन, हाजी मलंग रोड, नांदिवली तलावाजवळ, कल्याण, ठाणे ४२१३०६ **येथे देखीलः** दुकान क्र. १५, तळ मजला, साई शॉपिंग सेंटर, कर्जत रायगड | 04.11.2022 / Rs.11,93,537.07 as on 20.09.2022 | 20.02.2024 | Rs.9,67,000/- / Rs.96,700/- |
| | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव शेलू, ता. कर्जत जिल्हा रायगडमध्ये वसलेल्या आणि जमिनीवर बांधण्यात आलेल्या साई शॉपिंग सेंटर म्हणून ज्ञात असलेल्या योजनेच्या तळ मजल्यावरील २३५ चौ. फू. मोजमाप असलेले दुकान क्र. १५, धारण केलेला घर क्र. ९७८ चा सर्व खंड आणि भूखंड ज्याची मालकी आणि ताबा तुमच्याकडे करार दिनांकित ११/०७/२०१९, जे उपनिबंधक कर्जत, कार्यालय क्र. २ ह्यांच्या कार्यालयामधील धारण केलेला नोंदणी क्र. ३५३०/२०१९ अनुसार नोंदणीकृत असलेले. | | | | |
| 3 | 4462220230000001 / 4462-KAMOTHE | **१) अशोक कुमार रॉय, २) चित्रा रॉय,** दोघेही राहणारः पत्ताः १७२, मल्हार मॅन्शन, नारायण मैनदर स्टील, खुडुकपाडा, कळंबोली, रायगड महाराष्ट्र ४१०२१८ | 22.11.2021 / Rs.10,19,960/- as on 01.11.2021 | 03.06.2022 | Rs.11,43,000/- / Rs.1,14,300/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** गाव चोरवले (वाकास), तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे वसलेल्या प्लॉट क्र. ५३०, आर १७२ चौ. मी. धारण केलेला सर्वे क्र. २७. | | | | |
| 4 | 4411210130000045 / 4411-KOPARKHAIRNE | **१) राजेश तुकाराम पधार, २) प्रियांका राजेश पधार** दोघेही येथे राहणारः वांद्रे गाव, पोस्ट आंबोली तालुका खेड, जिल्हा पुणे -४१०५०५ | 11.10.2021 / Rs.11,40,602/- as on 29.09.2021 | 03.06.2022 | Rs.813000/- / Rs.81,300/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** गाव देवाड, तालुका पनवेल, जिल्हा रायगडच्या हद्दीमधील ग्रामपंचायत देवाड येथे वसलेल्या ग्रामपंचायत घर मालमत्ता क्र. ५०६,जूने घर क्र. २१४, वर बांधण्यात आलेल्या "हरी जनार्दन अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील २७० चौ. फू. मोजमाप क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ३०५ चा सर्व खंड आणि भूखंड आणि ज्याच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वेस किंवा त्या दिशेनेः पार्किंग, दक्षिणेस किंवा त्या दिशेनेः इमारत, पश्चिमेस किंवा त्या दिशेनेः रोड, उत्तरेस किंवा त्या दिशेने : चाळ | | | | |
| 5 | 4416210130000074 / 4416-KALYAN | **१) सुरेश प्रताप सिंग, २) श्रीमती रोमी सिंग** दोघेही येथे राहणारः खोली क्र. ११, सरस्वती निवास, दुर्गामाता मंदीर रोड, वारके हॉस्पिटल जवळ, कोळसेवाडी कल्याण, पूर्व कल्याण, काटेमानिवली, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०६ | 11.10.2021 / Rs.13,32,478/- as on 30.09.2021 | 03.06.2022 | Rs.10,01,000/- / Rs.1,00,100/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** ग्रुप ग्रामपंचायत शेलूच्या हद्दीमधील गाव भांडीवली, ता. कर्जत जिल्हा रायगड येथे वसलेल्या गावठाण घर क्र. ११८९ वर बांधण्यात आलेल्या भाग्यश्री अपार्टमेंट म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ६३० चौ. फूट मोजमाप असलेल्या मालमत्तेचा सदनिका क्र. १०१ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | | |
| 6 | 4411210130000120 / 4411-KOPARKHAIRNE | **१) इरफान आदम हकीम, २) परवीन इरफान हकीम,** घर क्र. ६९४/सी, भिंगरी गाव, एमएसईबी बोर्ड समोर, जुने पनवेल, रायगड, रायगड (एमएच) महाराष्ट्र ४१०२०६ | 11.10.2021 / Rs.34,66,490/- as on 27.09.2021 | 03.06.2022 | Rs.18,35,000/- / Rs.1,83,500/- |
| | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** गाव उमरोली, तालुका पनवेल जिल्हा रायगड येथे वसलेल्या सर्वे क्र. ५६/३, ५६/१, ५६/२ ते ५ वर बांधण्यात आलेल्या निर्मिती गार्डन (फेज-२) प्रकल्पामधील "मॅरीगोल्ड" म्हणून ज्ञात असलेल्या इमारत क्र. १ च्या ए विंगमधील तळ मजल्यावरील ४५.८०७ चौ. मी. मोजमाप असलेल्या मालमत्तेचा सदनिका क्र. ए-००२ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | | |

**मालमत्ता (मत्तां) च्यापाहणीचा दिनांक आणि वेळ : ०२-०८-२०२४ आणि ०९-०८-२०२४ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. पर्यंत**
**बोली आणि इरठे सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ : १९-०८-२०२४ रोजी स. ११ वा ते सायं. ५ वा. दरम्यान**
**लिलावाचा दिनांक आणि वेळ : २०-०८-२०२४ रोजी स. ११ वा. ते दु. २.०० वा.**

**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआरमध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे अदा केले जावे), बोली सादर करण्याचे ठिकाणः** १. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट, हॉटेल झायका पुढे, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१ **(अनु. क्र. १,२,४ आणि ६). २.** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. १ ला मजला, १०१/ए, सिद्धारूढ अपार्टमेंट, ठाणे बेलापूर रोड, विश्वकर्मा नगर, कळवा नाका, ठाणे – ४००६०५ **(अनु. क्र. ३,५) (संपर्क व्यक्तीः नितीन गमरे ८०७०१०७८९० शिवाजी खाडे : ७०५८०८०९१५)**

**अटी व शर्तीः-** ई-लिलाव "जेथे आहे तसे", "जसे आहे तसे" आणि "जे काही आहे ते" आधारावर आयोजित केले जात आहे.
१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहिती आणि माहितीनुसार, कोणत्याही मालमत्तेवर कोणताही बोजा नाही. तथापि, इच्छूक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचे बोजा, मालमत्तेचे शीर्षक/लिलावात ठेवलेले दावे/हक्क/देय/दावे यासंबंधी स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात कोणत्याही वचनबद्धतेची किंवा बँकेच्या कोणत्याही प्रतिनिधित्वाची स्थापना करत नाही आणि मानली जाणार नाही. बँकेला ज्ञात असो वा अज्ञात असो सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्या/अधिकार/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
२. बोली सबमिट करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशीलाची तपासणी करणे आणि त्यांचे समाधान करणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. लिलावात ठेवलेल्या मालमत्तेची तपासणीप्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद केल्याप्रमाणे साइटवर इच्छुक बोलीदारांना परवानगी दिली जाईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४ .इ लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त इ लिलाव सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून संपर्क व्यक्ती : प्रभाकरन एम-(मो क्र ७४१८२८१७०९) यांच्याकडून घेण्यात येणार आहे. इच्छूक बोलीदार याना सल्ला देण्यात येतो की त्यांनी https://www.bankeauctions.comकिंवा www.ujjivansfb.in/e-auctions येथे भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदवण्यिासाठी https://www.bankeauctions.com येथे भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना इ लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९१९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र नम्निस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा नर्णिय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्री साठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. ही सूचना महत्वाच्या मुद्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदार यांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत. अशा घटना टाळण्यासाठी बोलीदार यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे जे लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेऊ शकतील.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**ठिकाणः ठाणे**
**दिनांक : २९.०७.२०२४**

**सही/- प्राधिकृत अधिकारी**
**उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**